26-05-2024-Dai-09_Layout 1 5/25/2024 9:30 PM Page 1



# भविष्यात अपघात रोखण्यासाठी फलक, गतिरोधक हवेच

## वाहनचालकांकडून नियमाचे पालन करावे | अरुंद रस्त्याचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर

■ *स्वप्नेश च्यारी*
*टीम दैनिक हेराल्ड*

**फोंडा, दि. २६ :** शिरोडा मतदार संघातील अरुंद रस्त्यावर दोन दिवसात दोघांचा अपघाती बळी गेला आहे. त्यामुळे अरुंद रस्त्याचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. टॉप कोला – बोरी येथे गुरुवारी सकाळी झालेल्या अपघातात सतीश गावडे या स्कूटर चालकाचा मृत्यू तर शुक्रवारी मापा – पंचवाडी येथे टँकर, ट्रक व कार यांच्यात झालेल्या अपघातात टँकर मध्ये असलेल्या एकाचा मृत्यू झाला. भविष्यात अपघात रोखण्यासाठी आवश्यक फलक तसेच गतिरोधक बसविण्याची अत्यंत गरज व्यक्त केली जात आहे.

टॉप कोला– बोरी येथे गुरुवारी स्कुटर व ट्रक यांच्यात अपघात झाला होता. अरुंद रस्त्यामुळे कित्येक अपघात परिसरातील घडले आहेत. त्यात अनेक जणांना अपघाती मृत्यू झाले आहे. टॉप कोला ते साई मंदिर पर्यंत दररोज वाहतूक कोंडीचा त्रास लोकांना सहन करावा लागत आहे. या रस्त्याचे रुंदीकरण करण्यासाठी कायदेशीर सोपस्कर पूर्ण करण्यात आले आहे. पण अजून पर्यंत कामाला सुरुवात झाली नसल्याने अधून मधून अपघात घडत आहे. बोरी येथील साई बाबा मंदिर समोरील रस्त्यावर सुद्धा यापूर्वी अनेक जणांना अपघातात प्राण गमवावे लागले आहे. दर गुरुवारी होणाऱ्या उत्सवाच्या वेळी मंदिरात भाविकांची गर्दी उसळत असते. त्यादिवशी वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी पोलिसांची धावपळ उडत असते. त्यामुळे बोरी पूल ते बायथाखोल पर्यंत रस्त्याचे रुंदीकरण अत्यंत गरजेचे आहे.

मापा – पंचवाडी येथे शुक्रवारी झालेल्या ३ वाहनाच्या अपघातात एका व्यक्तीचा मृत्यू आला. काही वर्षांपूर्वी त्याच स्थळावर अपघातात एक विध्यार्थ्यांचा अपघाती मृत्यू झाला होता. रस्ता अरुंद असल्याने दोन अवजड वाहने एकाच वेळी रस्त्यावरून ये – जा करू शकत नाही. त्या ठिकाणी रस्ता अरुंद असून सुद्धा वाहन चालकांना सूचना देणारे फलक दिसून येत नाही. त्यामुळे अपघात घडत असल्याचे दिसून येत आहे. अरुंद रस्त्याची माहिती दर्शविणारे फलक लावण्याची अत्यंत आवश्यकता आहे. तसेच वाहनाचा वेगळा कमी करण्यासाठी रस्त्यावर गतिरोधात घालण्याची गरज आहे.

शिरोडा ते सावर्डे मार्गांवरून अवजड वाहतूक न करण्यासाठी स्थानिकांनी अनेक वेळा विविध खात्याकडे रीतसर तक्रारी दाखल केल्या असल्याची माहिती स्थानिकांकडून मिळाली आहे. अनेक खनिज, खडी तसेच चिरे वाहू ट्रक भरधाव वेगाने धावत असल्याने अपघात घडण्याची शक्यता स्थानिक लोक व्यक्त करीत आहे. मापा ते पंचवाडी पर्यंतच्या अरुंद रस्त्यावर गेल्या दोन वर्षात अनेक अपघात घडले आहे.



टॉप कोला – बोरी येथील अरुंद रस्त्यावर दिसून येणारी वाहनाची वर्दळ.

### नियमाचे पालन करीत नसल्यानेच अपघात : शिरवईकर



**दक्षिण गोवा वाहतूक पोलीस उपअधीक्षक प्रबोद शिरवईकर यांनी मापा पंचवाडी येथे शुक्रवारी झालेल्या अपघात स्थळाची पाहणी करण्यात आली आहे. त्याठिकाणी आवश्यक असलेले फलक तसेच गतिरोधक घालण्यासाठी बांधकाम खात्याकडे कायदेशीर सोपस्कर पूर्ण करण्यात येणार आहे. अपघात रोखण्यासाठी पोलिसांतर्फे जागृती करण्यात येत आहे. परंतु वाहन चालविताना अनेक चालक नियमाचे पालन करीत नसल्याचे दिसून येते. आवश्यक ठिकाणी लावलेल्या फलकाच्या मार्गदर्शनाखाली वाहने चालवणे आवश्यक असल्याचे सांगितले.**

### पालकांनी नियमाची जाणीव करून द्यावी : सामंत



**निरंकाल– बेतोडा येथील हेमंत सामंत यांनी पालकांनी मुलांना वाहतूक नियमाची जाणीव करून देणे अत्यंत गरजेचे बनले आहे. अल्पवयीन मुलांना वाहने देऊन अनेक पालक एक प्रकारे मुलांना वाहने चालविण्यात प्रोत्साहित करीत असतात. मात्र एखादा अपघात घडल्यानंतर पालक स्वतः ऐवजी सरकारला दोष देताना दिसून येते. वाहन चालवीण्याचा परवाना घेऊन मुलांना वाहन चालविण्यासाठी दिल्यास निश्चित वाढत्या अपघातावर काही प्रमाणात नियंत्रण येऊ शकते. राज्यात सध्या युवा वर्गाकडून दुचाकी चालवीताना हेल्मेट परिधान करीत नसल्याने अपघातात बळी जात असल्याचे दिसून येते. त्यामुळे प्रत्येक पालकांनी दुचाकी चालवीतना हेल्मेट सक्तीने परिधान करण्याचे धडे देण्याचा प्रयत्न केला पाहिजे असल्याचे सांगितले.**

### अन्य ठिकाणी धोक्याची सूचना देणारे फलक आवश्यक : नाईक



**शिरोडा येथील सुभाष नाईक यांनी वाहनाची संख्या वाढत असल्याने आणि भरधाव वेगाने जाणाऱ्या वाहनामुळे अपघाताचे प्रमाण वाढले आहे. अपघात रोखण्यासाठी अरुंद रस्ते व अन्य धोक्याची सूचना देणारे फलक आवश्यक ठिकाणी लावण्याची अत्यंत गरज आहे. वाहन चालकांना आवश्यक सूचना दिसून येत नसल्याने अपघात घडत असल्याचे दिसून येते. वाहतूक नियमासंबंधी सरकार जागृती करीत असते. पण युवा वर्ग वाहतूक नियमाचे पालन करीत नसल्याचे अधिक दिसून येते असल्याचे सांगितले.**



फोंडा : भारत नाईक यांना 'नेशन बिल्डर अवॉर्ड' देऊन सन्मान करताना प्रमुख पाहुणे भास्कर खांडेपारकर. (शैलेश बोरकर)

# शैक्षणिक क्षेत्रातील उत्कृष्ट योगदानासाठी भारत नाईक सन्मानित

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**बोरी, दि. २५ :** श्रीमती आनंदीबाई महानंदू नाईक हायस्कूलचे मुख्याध्यापक भारत नाईक यांना त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक कार्याची दखल घेऊन रोटरी क्लब ऑफ फोंडातर्फे उत्कृष्ट शिक्षक म्हणून 'नेशन बिल्डर अवॉर्ड'ने भास्कर खांडेपारकर यांच्या हस्ते शाल, श्रीफळ ,सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. त्यांच्यासोबत अन्य दोन शिक्षिका मातोश्री इंदिराबाई बाबुराव खांडेपारकरच्या दीप्ती नाईक व सरकारी हायस्कूल, बेतोडाच्या नीता नाईक यांनाही या वॉर्डने सन्मानित करण्यात आले.

यावेळी फोंडा रोटरीचे अध्यक्ष नासिर अली वाहिद, श्याम नाईक,प्रकाश नाईक,डॉ.विलास नाईक, डॉ. बबन काकोडकर, प्रिया नाईक व अन्य रोटरीचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

फोंडा रोटरीचे अध्यक्ष नासिर अली वाहिद यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात शिक्षकांचे समाजातील महत्त्व व राष्ट्रनिर्मितीत असलेले त्यांचे योगदान किती मौल्यवान आहे, हे सांगितले. कार्यक्रमाची सुरुवात पॉल हॅरिस यांच्या प्रतिमेस माळा अर्पण करून करण्यात आले.

भारत नाईक म्हणले की, शिक्षक हे राष्ट्रनिर्मितीचे महत्वाचे काम करीत असतात. रोटरी उत्कृष्ट पुरस्कार म्हणजेच शिक्षकांनी समाजाप्रती व शिक्षणाप्रती केलेल्या कामाची पावतीच होय. या पुरस्कारामुळे इतरांना देखील प्रेरणा मिळेल.

अखिल गोवा शिक्षक संघटनेचे अध्यक्ष तथा मातोश्री इंदिराबाई बाबुराव खांडेपारकर हायस्कूलचे उप–प्राचार्य दत्तात्रय नाईक ,शिक्षक विजय परुळेकर,भिसो गावस,देवानंद सतरकर,नामदेव नाईक,सुभाष नाईक , रामदास नाईक ,सुभाष नाईक,देवदत्त नाईक यांनी सत्कारमूर्तीचे स्वागत केले. फोंडा रोटरीचे सचिव वैशाली खांडेपारकर यांनी सूत्रसंचालन केले. प्रिया नाईक यांनी आभार व्यक्त केले.

# प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती विकणाऱ्यांवर कडक निर्बंधांची गरज

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पेडणे, दि. २६ :** येणाऱ्या गणेशचतुर्थीत प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मुर्त्या विकणाऱ्यांवर कडक निर्बंध घालावेत. हस्तकला महामंडळामार्फत प्रत्येक गणेशमूर्तीमागे दिले जाणारे तीनशे रुपये अनुदान रोखून धरावे, अशी मागणी तालुक्यातील चिकणमातीपासून मूर्ती बनविणाऱ्या मूर्तिकारांनी केली आहे.

सरकारने चिकणमातीला पर्याय म्हणून प्लास्टर ऑफ पॅरिसला प्राधान्य देण्याऐवजी मूर्तिकारांना चिकणमाती उपलब्ध करून देण्याची गरज आहे. तालुक्याचा विचार केला तर मांद्रे पंचायत क्षेत्रात मोठ्या प्रमाणात चिकणमाती उपलब्ध आहे. ही माती वेळेवर उपलब्ध होत असून ती वेळेवर आणली पाहिजे. चिकण माती उपलब्ध होत नाही. अशी चुकीची माहिती कोणत्याही मूर्तिकाराने देऊ नये. प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तीवर नियंत्रण ठेवण्यासाठी केवळ चिकणमातीचा वापर मूर्तिकारांनी करावा, असे आवाहन आता युवा मूर्तीकार करीत आहेत.

केवळ चिकणमातीच्याच मूर्तीचे गणेश भक्तांनी पूजन करावे. प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तीना स्थान देऊ नये, अशी गावात जनजागृती करणार आहे, असे मांद्रेचे सरपंच बाळा नाईक यांनी प्रतिनिधींशी सांगितले. पेडणे तालुक्यासह गोव्यातील प्रत्येक घराघरात गणेश पूजन केले जाते. पेडणे तालुक्यात दहा पंधरा गणेश मूर्तिकार आहेत. या मूर्तिकारांना अनुदानाच्या रूपात वेगळ्या योजना मिळतात. काही मूर्तिकारांना चिकणमाती तयार करण्यासाठी यंत्रणा उपलब्ध करून दिली जाते. काही मूर्तिकार फक्त चिकणमातीचा वापर करून गणेशमूर्ती करतात. त्यांना सरकारने दूरदृष्टी ठेवून कधी चिकणमातीचे गोळे करण्यासाठी यंत्रणा उपलब्ध करून दिली नाही. परंतु ज्यांच्याकडे हातावर मोजता येणाऱ्या चिकणमातीच्या मुर्त्या असतात, मात्र मोठ्या प्रमाणात शेकडो संख्येने 'प्लास्टर ऑफ पॅरिस'च्या मूर्तीअसतात, त्यांनाच यंत्रणा आणि अनुदान दिले जाते. हा चिकणमातीच्या मुर्त्या करणाऱ्या मूर्तिकारांवर अन्याय असल्याचे बोलले जात आहे.

यंदाच्या चतुर्थीला हस्तकला महामंडळाचे चेअरमन प्रवीण आर्लेकर यांनी प्रत्येक गणेश मूर्तीमागे तीनशे रुपये अनुदान देण्याचे जाहीर केले. हस्तकला महामंडळाचे चेअरमन प्रवीण आर्लेकर, संचालक मंडळ व अधिकाऱ्यांनी प्रामाणिकपणे केवळ चिकणमातीच्याच मुर्त्या करणाऱ्यांना अनुदान द्यावे.त्या–त्या मतदारसंघातील लोकप्रतिनिधींनी हस्तक्षेप न करता केवळ चिकणमातीच्या मुर्त्या तयार करतात, त्यांच्याच अर्जांना मंजुरी द्यावी, अशी मागणी केली जात आहे.

मोरजी येथील यतीश म्हादळेकर म्हणाले की, मी मोरजी येथे राहतो. जवळपास २५–२६ वर्ष मी चिकणमातीपासून काम करतो. आमची सलग चौथी पिढी हे गणपतीचे काम करीत आली आहे. पणजोबांपासून ते आत्तापर्यंत चिकणमातीच्या मुर्त्या आम्ही बनवतो. माझे बाबा देऊ म्हादळेकर यांच्याकडून धडे घेऊन हे चिकणमातीचे काम शिकत आलो. गणपती करण्यासाठी लागणारी माती अजुनही हवी तेवढी उपलब्ध होते. मांद्रे गावातही माती मिळते. खास सांगायचे तर मांद्रे गावातील मातीचे वैशिष्ट्य म्हणजे ही माती गणपतीच्या कामासाठी खूप चांगल्या प्रकारे वापरता येते.





**श्रद्धा गवंडी या पार्सेतील युवा मूर्तिकार म्हणाल्या की, गणपती बनविण्यासाठी चिकणमाती भरपूर प्रमाणात उपलब्ध आहे. 'आता माती मिळत नाही' ही केवळ अफवा आहे. अजूनही गावागावात पारंपरिक मातीपासूनच मूर्ती साकारली जाते. राज्यात प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींचा मोठ्या प्रमाणात वापर होवून पर्यावरणाला हानी पोहोचते. हस्तकला महामंडळाने यावर नियंत्रण ठेवायला हवे. कायदेशीर पध्दतीने यावर बंदी आणायला हवी. मूर्ती विक्री केंद्रात जाऊन तपासणी करून त्यावर कायदेशीर कारवाई करावी. अनुदान देण्याआधी सक्त तपासणी करावी. पीओपी खरेदीवर देखील बंधन हवे. तरच पर्यावरण सुरक्षित राहील.**



**''यंदा जे मूर्तिकार प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती तयार करतील, त्यांना कसल्याच प्रकारचे अनुदान दिल जाणार नाही. त्यांची पूर्णपणे चौकशी केली जाईल.'' हस्तकला महामंडळाचे चेअरमन प्रवीण आर्लेकर राज्यात आणि तालुक्यामध्ये जेवढ्या गणेश मूर्ती आवश्यक आहेत, तेवढ्या मूर्ती मूर्तिकार चिकणमातीपासून तयार करू शकतो का, हा सवाल आता उपलब्ध होत आहे. यापूर्वी किंवा मागच्या कित्येक वर्षांपूर्वी प्रत्येक गणेश मूर्तिकार केवळ चिकणमातीपासून मुर्त्या बनवायचे. केवळ चिकण मातीच्याच मूर्तीचे पूजन गणेश भक्त करीत असे; परंतु हल्ली प्रत्येकास हलक्या मुर्त्या आणि मोठ्या आकाराच्या मुर्त्यांची गरज भासते. गणेशभक्तच हलक्या आणि मोठ्या प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मुर्त्यांना प्राधान्य देत असतात.**

**प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती आता गावातही भक्त आणू लागले असून ते चुकीचे आहे. गणपतीची मूर्ती तयार करण्यासाठी आवश्यक चिकणमाती उपलब्ध आहे.**

**चिकणमातीच्या मूर्तीत दिसणारा जिवंतपणा प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तीत दिसत नाही. याबाबत आम्ही पंचायतीतर्फे जनजागृती करणार आहोत.''**

**- बाळा नाईक (सरपंच, मांद्रे )**

# रस्त्यावर पार्किंग केलेल्या वाहनांवर कारवाईची गरज

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पेडणे, दि. २५ :** तालुक्यातील मांद्रे मतदारसंघाची किनारपट्टी पर्यटनदृष्ट्या दिवसेंदिवस महत्त्वाची ठरत असल्यामुळे पर्यटन हंगाम असो किंवा नसो, या किनारी भागात वर्षाचे ३६५ दिवसही देश–विदेशातील पर्यटक आपापली वाहने घेऊन येत असतात. रस्त्याच्या बाजूला असणारी हॉटेल, रेस्टॉरंट, क्लब यांची स्वतःची पार्किंग व्यवस्था नसल्यामुळे ही वाहने थेट रस्त्याच्या बाजूला पार्क करून वाहतुकीची कोंडी करीत असतात. त्यांच्यावर कडक कारवाई करण्याची मागणी नागरिक करीत आहेत. शिवाय, पेडणे पोलीस, वाहतूक खाते यांनीही किनारी भागात अधूनमधून भेटी देऊन 'नो पार्किंग' झोन फलकांच्या ठिकाणी वाहने पार्क करणाऱ्यांना एकदा सूचना देऊन दुसऱ्या वेळी त्यांच्यावर कारवाई करण्याची गरज आहे, असे मत गजा शेटगावकर यांनी व्यक्त केले.

पर्यटन हंगाम म्हटल्यानंतर 'थोडी खुशी थोडा गम' अशी स्थिती असते. देश–विदेशातून येणाऱ्या पर्यटकांना चांगल्या प्रकारे नाश्ता, जेवण, डिनर आणि मनोरंजन करणारे संगीतही त्या–त्या भागातील क्लब, नाईट क्लब, रेस्टॉरंट, रिसॉर्ट व्यावसायिक करीत असतात. त्यामुळे देश– विदेशातील पर्यटक येतात . परंतु पर्यटक त्यांच्या वाहनांना योग्य ती पार्किंग व्यवस्था नसल्यामुळे मिळेल तिथे रस्त्याच्या दोन्ही बाजूला वाहने पार्क करून वाहतुकीची कोंडी केली जाते. रस्त्याच्या बाजूला रेस्टॉरंट, हॉटेल्स, क्लब यांनी आपापल्या ग्राहकांसाठी वाहन पार्किंगची सोय केली आहे.

की नाही, याची पाहणी अधिकाऱ्यांनी करण्याची गरज आहे. रस्त्यावर वाहने पार्क करून रस्ते अडविण्याचा प्रकार वर्षाचे बाराही महिने मांद्रे मतदारसंघातील किनारी भागात फेरफटका मारल्यास दिसून येईल.

पर्यटन हंगाम संपुष्टात येण्यास १० दिवसांचा अवधी आहे. हा हंगाम संपुष्टात आल्यानंतर ऑक्टोबरपासून सुरू होणाऱ्या पर्यटन हंगामात किनारी भागातील रस्त्याच्या बाजूला असलेली हॉटेल्स, रेस्टॉरंट व आस्थापनांनी निदान पर्यटन हंगामात तरी आपापल्या ग्राहकांच्या वाहनांची पार्किंग सोय करून होणारी वाहतुकीच्या कोंडीवर नियंत्रण मिळवावे, अशी मागणी नागरिक करीत आहेत.

**'नो पार्किंग' झोन कुणासाठी ?**

मोरजी पंचायत मंडळाने गेल्या वर्षी पुढाकार घेऊन मोरजीतील काही मुख्य रस्त्यावर आणि अंतर्गत रस्त्याच्या बाजूला 'नो पार्किंग' झोन अर्थात 'नो पार्किंग' फलक लावण्यात आले; परंतु आजची स्थिती बघितल्यानंतर ज्या ठिकाणी 'नो पार्किंग' फलक आहे, त्याच ठिकाणी वाहने पार्क केली जातात. या वाहनावर कोणत्याही प्रकारची कारवाई होत नाही. त्यासाठी हल्लीच उत्तर गोवा वाहतूक पोलीस उपअधीक्षक, पेडणे वाहतूक पोलीस निरीक्षक, मोपा पोलीस वाहतूक निरीक्षक, आदींनी किनारी भागात जाऊन कुठे पार्किंगची समस्या निर्माण होते, याची माहिती जाणून घेतली आहे. भविष्यात असे प्रकार घडत राहिले तर त्या वाहनांवर कारवाई करण्याचा इशारा अधिकाऱ्यांनी दिला आहे.



### क्रमांक नसलेली वाहने रस्त्यावर कशी ?

**या किनारी भागात काही विदेशी पर्यटक किंवा स्थानिक नागरिकसुद्धा वाहनांना क्रमांक नसताना रस्त्यावरून सुसाट वेगाने वाहने हाकत असतात. एखाद्या वेळी समोरासमोर येणाऱ्या वाहनांमध्ये अपघात घडल्यास कोणत्या वाहनाने अपघात घडवला, याची माहिती कशी मिळणार? वाहतूक पोलिसांनी आणि वाहतूक खात्याने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन ज्या वाहनांना क्रमांकच नाही, अशा वाहनांवर कडक कारवाई करावी.**



श्रीराम सप्ताहाची आकर्षक स्थापना डॉ. शिरीष बोरकर कुटुंबीयासमवेत. (शैलेश बोरकर)

# मकरंदबुवा रामदासी यांच्या कथा सप्ताहात श्रोते लीन

■ *टीम दैनिक हेराल्ड*

### बोरी येथील श्रीराम कथा सप्ताहास भाविकांची गर्दी

**बोरी, दि. २५ :** देऊळवाडा–बोरी येथील डॉ. शिरीष बोरकर याच्या निवासस्थानी श्रीराम कथा सप्तहाला उदंड प्रतिसाद लाभला. बोरकर कुटुबियातर्फे खास उभारलेल्या पर्णकुटित आकर्षक श्रीरामाचे विविध देखावे, स्वागत दरवाज्यावर पारपारीक गोमतकीय माटोळी यामुळे एक वेगळेच स्वरुप सप्ताहा स्थळी बघायला मिळाले. सहकार मंत्री सुभाष शिरोडकर, मुख्यमत्री डॉ. प्रमोद सावत सप्तनी उपस्थित होते. गोव्यातील श्रीराम भक्तानी सज्जनगडावरील रामदासी मकरंदबुवा याच्या सुरेल प्रवचनाचा श्रवणीय आनद श्रीरामभक्तानी घेतला. वेदशास्त्र पडीत गोडबोले, मनोज भाडणकर यानी श्रीराम सप्ताहाचे स्थापना करुन धार्मिक विधी संपन्न केला. डॉ. शिरीष बोरकर याच्या कुटुबातर्फे स्वागत व आदरातिथ्य करण्यात आले. गोव्यातील कानाकोपर्यातून लोकांनी खास भेट देऊन श्रीराम कथेचा आस्वाद घेतला.